# हिंदी विभाग, मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव *आणि*
# हिंदी सेवा प्रतिष्ठान, जळगाव

दिनांक- 08/09/2017

प्रति,

**मा. संपादक,**

सर्व वर्तमान पत्रे, जळगाव

विषय : **खालील बातमीस प्रसिद्धी देणेबाबत...**

---

## मू.जे.चे हिंदी विभाग आणि हिंदी सेवा प्रतिष्ठान यांच्या वतीने जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन

जळगाव :- 08/09/2017

**मानवी समुदायाला आपल्या मातुभाषा व राष्ट्राची भाषा यांच्या विषयी आपसूकच स्नेह आणि आत्मीयता असते. आपल्या देशाची राजभाषा आणि भारतीय नागरिकांनी ज्या भाषेला राष्ट्राची भाषा म्हणून मानलेले आहे, अशा हिंदी भाषेविषयी प्रचार-प्रसार व्हावा म्हणून 14 सप्टेंबर हिंदी दिनाचे औचित्य साधून मूळजी जेठा महाविद्यालयातील हिंदी विभाग आणि हिंदी सेवा प्रतिष्ठान, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'जिल्हास्तरीय निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.**

**या स्पर्धेसाठी 1) मेरे सपनों का भारत 2) सोशल मीडिया और युवा पीढ़ी 3)विश्व पटल पर हिंदी असे तीन विषय निर्धारित केले आहेत. संबंधित विषयांपैकी कुण्या एका विषयावर स्व- लिखित निबंध, 1000 शब्दामध्ये A 4 साईज कागदाच्या एका बाजूस हिंदी भाषेत लिहावयाचा आहे. ही स्पर्धा जळगाव जिल्ह्यातील वरिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी नि:शुल्क असणार आहे. स्पर्धेची पारितोषिके प्रथम - 1000 रोख, प्रमाणपत्र व भेटवस्तू, द्वितीय -700 रोख, प्रमाणपत्र व भेटवस्तू, तृतीय- 500 रोख, प्रमाणपत्र व भेटवस्तू, उतेजनार्थ -300 रोख, प्रमाणपत्र व भेटवस्तू आणि सर्व सहभागी स्पर्धकांना सहभागीता प्रमाणपत्र अशा स्वरूपाचे असतील.**

**सदर स्पर्धेतील विजयी स्पर्धकांना दि. 20 सप्टेंबर 2017 रोजी मू.जे.महाविद्यालयाच्या ओल्ड कॉन्फरन्स हॉल , मुख्य इमारत येथे होणाऱ्या कार्यक्रमात डॉ.मेहेन्द्र ठाकूरदास पुणे यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात येतील. स्पर्धेकरिता विद्यार्थ्यांनी आपले निबंध दि. 15 सप्टेबर 2017 पर्यंत, द्वारा, हिंदी विभाग, मूळजी जेठा महाविद्यालय, जळगाव या पत्त्यावर पाठवण्याचे आवाहन संयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.**

***हिंदी संवाद से हृदय- हृदय जुडे***